# मानवी तस्करी गुलामगिरीचा आधुनिक प्रकार : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

मानवी तस्करीला गुलामगिरीचा आधुनिक प्रकार म्हणून संबोधत सर्वोच्च न्यायालयाने त्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने प्रत्येक राज्यात मानव तस्करी विरोधी ब्युरो आणि अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) सारखी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्याची शिफारस केली आहे. या निर्णयात न्यायालयाने वेश्यागृहे बंद करणे, मुलांना धोकादायक काम करायला लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि मानवी तस्करी करणाऱ्यांची मालमत्ता जप्त करणे, रुग्णालयातून नवजात बालक बेपत्ता होत असेल तर त्या रुग्णालयाचा परवाना रद्द केला पाहिजे,असे निर्देश दिले आहेत.

उत्तरप्रदेशातील नवजात बालक तस्करी प्रकरणातील आरोपींना जामीन मिळावा म्हणून आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती जे. बी. पारडीबाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.नवजात बालकांची चोरी करून विक्री करणाऱ्या टोळीतील सदस्यांचा जामीन रद्द करत,खंडपीठाने ९५ पानांचा सविस्तर निकाल लिहिला आहे. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून (एनएचआरसी) मदत मागितली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा(एनएचआरसी)ने अहवाल तयार करण्यासाठी भारतीय संशोधन आणि विकास संस्थेची निवड केली होती. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात बर्डच्या शिफारशींचा समावेश केला आहे.

न्यायालयाने सर्व राज्यांना निकालाच्या परिच्छेद ३४ मध्ये केलेल्या शिफारशी वाचण्यास आणि त्यांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यास सांगितले आहे.न्यायालयाने आपल्या निर्णयात २२ शिफारशी नोंदवल्या आहेत.

### बाळ तस्करी प्रकरण गांभीर्याने घ्यावे

नवजात बाळ तस्करी रोखण्यासाठीच्या शिफारशी सर्व राज्यांनी पाळाव्यात असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. राज्य सरकारांना लवकरात लवकर याची अंमलबजावणी करण्यास सांगितले. देशभरातील उच्च न्यायालयांना या तस्करी प्रकरणांमधील प्रलंबित खटल्यांची स्थिती मागवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निर्देशांची अंमलबजावणी करण्यात दाखवण्यात आलेली कोणतीही हलगर्जी गंभीरपणे घेतली जाईल आणि न्यायालयाचा अवमान मानला जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# नॅशनल हेराल्डप्रकरणी आरोपपत्रात सोनिया, राहुल गांधींचे नाव

**नवी दिल्ली |** नॅशनल हेराल्ड प्रकरणात मनी लाँड्रिंगच्या आरोपाखाली अंमलबजावणी संचालनालयाने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी,काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी ९ एप्रिल रोजी दाखल केलेल्या आरोपपत्रातील महत्त्वाचे मुद्दे तपासल्यानंतर पुढील सुनावणीसाठी २५ एप्रिल ही तारीख निश्चित केली आहे. न्यायाधीशांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की, या प्रकरणाचा विचार करून पुढील सुनावणी २५ एप्रिल २०२५ रोजी होईल. त्या दिवशी, अंमलबजावणी संचालनालयाचे विशेष वकील आणि तपास अधिकारी यांनाही केस डायरी न्यायालयात सादर करावी लागेल, जेणेकरून ती न्यायालयालाही बघता येईल.

# एसटी सेवकांचे थकीत वेतन जमा

**मुंबई |** एसटी कर्मचाऱ्यांचे थकीत ४४ टक्के वेतन खात्यावर जमा करण्यात आले आहे. या आधी मार्च महिन्याचे केवळ ५६ टक्के वेतन देण्यात आले होते.त्यावरून एसटी कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच विरोधकांनीही राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले होते. आता राज्य सरकारकडून उर्वरित वेतन एसटी कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे.

# वृद्ध दाम्पत्यास धमकावणाऱ्यांना बेड्या; पाच दुचाकी जप्त

**निफाड | प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील नैताळे-गाजरवाडी रस्त्यावर असणाऱ्या वृद्ध दाम्पत्यांच्या घरात बेरात्री शिरून त्यांना धमकावून जबरी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना चोरलेल्या ५ दुचाकीसह निफाड पोलिसांनी अटक केली.

दि.२० मार्च २०२५ ला रात्री १०.३० च्या सुमारास गाजरवाडी शिवारात अज्ञात आरोपींनी फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन वृद्ध पती-पत्नीला व नातू यांना धमकावत व त्यांना मारहाण करत त्यांनी आरडाओरड करू नये म्हणून त्यांच्या तोंडाला दाबून धरले. तर दोन आरोपींनी आरडाओरडा केला तर तिघांनाही कोयत्याने मारून टाकू, असा दम देऊन तिघांच्या तोंडाला चिकटपट्टी लावण्याचा प्रयत्न करत असतांना फिर्यादी यांनी झटापट केली असता आरोपींनी वयोवृद्ध दाम्पत्याच्या हातावर कोयत्याने मारुन वार केले होते. या झटापटीत आरडाओरड झाल्याने तीन आरोपींनी काळ्या रंगाचे कपडे व एका आरोपीने पोपटी रंगाचे कपडे घातलेले होते. परिसरातील नागरिक जमा होतील या भीतीने हे आरोपी तेथून पसार झाले. आरोपींनी आणलेली दुचाकीही तेथेच टाकून ते पळून गेले होते.

या गुन्ह्याच्या तपासासाठी विभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश गुरव व उपनिरीक्षक विश्वनाथ निकम यांनी तपासाची चक्रे फिरवून घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण व काही पुरावे सापडतात का? याबाबत तपास केला असता चाकण (पुणे) येथून एका आरोपीचा शोध घेऊन दुसरा आरोपी विंचूर येथून मिळाला. संशयित आरोपींची सखोल चौकशी करुन या गुन्ह्यासोबतच आरोपींनी पाच मोटरसायकलींचीही चोरी केल्याचे उघड झाले. उर्वरित गुन्हेगारांचा शोध सुरू असून या सराईत गुन्हेगारांकडून ५ मोटारसायकल व गुन्ह्यातील कोयता हस्तगत केला आहे.

पोलीस हवालदार अनिल शेरेकर व पोलीस शिपाई विनोद जाधव अधिक तपास करीत आहेत. सराईत गुन्हेगारांवर विविध कलमांअंतर्गत त्र्यंबकेश्वर, ठाणे, हरसूल, निफाड आणि लासलगाव पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पान १ वरून...

## आनंदघन वार्ता

मान्सून महत्त्वाचा आहे, जो सुमारे ४२.३ टक्के लोकसंख्येच्या उपजीविकेला आधार देतो. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) शेतीचा वाटा १८.२ टक्के आहे. शुद्ध शेती क्षेत्रातील ५२ टक्के लोक पावसावर अवलंबून आहेत. देशभरातील वीज निर्मितीसाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या जलाशयांमध्ये भर घालण्यासाठी हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे, मान्सून हंगामात सामान्य पावसाचा अंदाज देशासाठी मोठा दिलासा देणारा आहे.

## डिनर डिप्लोमसीने राजकीय चर्चांना उधाण

स्वबळाचा नारा दिला आहे. तसेच अटीशर्थीसह फडणवीसांना अप्रत्यक्ष पाठिंबा देखील जाहीर केला आहे. अशातच एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्या भेटीत कोणती राजकीय समीकरण उदयास येतात याची महाराष्ट्राला उत्सुकता लागून आहे. दरम्यान,राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठीची पार्श्वभूमी शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांनीच तयार केली आहे. एकनाथ शिंदे यांचे दूत म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यामुळेच आजच्या भेटीत उदय सामंत हेदेखील उपस्थित होते. या भेटीला जाताना त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना आधी प्रथम मी खुलासा करतो की मी कुर्ल्याच्या कार्यक्रमात होतो. मला निरोप आला की तातडीने या. त्यामुळेच मी आलो आहे. मी दोन वेळा राज ठाकरेंना का भेटण्यासाठी गेलो होतो, हे तेव्हाच सांगितले आहे. भेटीचे कारण काय आहे, हे मला माहिती नाही. मला एकनाथ शिंदे यांचा आदेश आला, त्यामुळे मी इथे आलो आहे, असे स्पष्टीकरण दिले.

## नगराध्यक्षांना हटवण्याचे अधिकार नगरसेवकांना

आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरुन बाजूला सारण्याचा प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर कार्यवाही करून नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात होती. आता राज्य सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षात संपत आहे.

# फेक एन्काऊंटरची चौकशी करा : खा.राऊत

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे राज्यातील पहिले महाशिबिर नाशिकमध्ये आज (दि.१६)होत आहे. त्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून खासदार संजय राऊत नाशिकला तळ ठोकून आहेत. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना राऊत यांनी काही गंभीर विषयांवर सरकारवर टीका केली.

यावेळी ते म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातला जो दहशतवाद आहे, खुनाखुनी आहे, त्याच्याशी वैभव नाईक सातत्याने आणि संघर्षाने लढा देत आहेत. वैभव नाईक त्या ठिकाणी १० वर्ष आमदार होते. आतापर्यंत जिल्ह्यात २७ खून झाले आहेत. त्यातले ९ खून हे शिवसैनिकांचे आहेत. अत्यंत निर्घृणपणे त्यांना मारण्यात आले आहे. आजही त्याठिकाणी असे हत्याकांड सुरूच आहेत. त्यांचा 'आका' कोण आहे? त्याबद्दल वैभव नाईक यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याचे उत्तर राज्याचे मुख्यमंत्री व राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देणे गरजेचे आहे.बीड घटनेपेक्षा भयंकर घटना सिंधुदुर्गमध्ये घडत आहेत, यासाठी आम्ही कोकणात जाणार आहोत. चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना खा.राऊत म्हणाले की, आम्हाला त्यांच्यासोबत अजिबात सत्तेत जायचे नाही. प्रत्यक्षात ईव्हीएमच्या माध्यमातून ते जिंकून आले आहेत. भाजपला कोणी मतदान केले नाही.चंद्रकांत पाटील यांना तरी अजिबात कोणी मतदान केले नाही. मोदींची बहीण तुलसीने ईव्हीएमबद्दल स्पष्टपणे सांगितले आहे, मुंबई महापालिकेसाठी आमच्याकडे सक्षम उमेदवार आहेत. मात्र त्यांच्याकडे फक्त ईव्हीएम आणि पैसे असल्याची टीका एका प्रश्नाच्या उत्तरात खा.राऊत यांनी केली.

लाडक्या बहिणींना ५०० रुपये देण्यात येणार आहेत. याबाबत लाडक्या बहिणींनी प्रश्न विचारले पाहिजे. प्रत्यक्षात राज्यात आर्थिक संकट आहे. फडणवीस कितीही बोलले तरी आर्थिक संकटात हे राज्य सापडले आहे. अजित पवार बोलत नसले तरी या आर्थिक चिंतेने ते देखील ग्रासले असल्याचे राऊत यांनी सांगितले. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमित शहा यांच्याकडे तक्रार केली की, आम्हाला निधी मिळत नाही. प्रत्यक्षात निधी मिळत नाही म्हणजे कुणाला मिळत नाही? जे काही गद्दार आमदारांना फक्त राज्य लुटायचे आहे त्यांना. या प्रश्नावर अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांना जे उत्तर दिले ते फार इंटरेस्टिंग आहे, तुम्ही त्याचा शोध घ्या, अशी सूचनाही खा. संजय राऊत यांनी पत्रकारांना केली.

## ऐन उन्हाळ्यात डेंग्यूने डोके वर काढले

महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी हा चिंतेचा विषय ठरत आहे. त्यामुळे मनपाकडून २५० जणांचे पथक तयार करुन घरोघरी जाऊन ते तपासणी करीत आहेत.दरम्यान, डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती ही स्वच्छ पाण्यात होत असल्याने नागरिकांनी फ्रीज, कुलरमध्ये पाणी साचू देऊ नये, डेंग्यूची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ रुग्णालयात जाऊन तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन मनपाने केले आहे.

## धावत्या रेल्वेत काढता येणार एटीएममधून रोकड

अडचणवजा गरज लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने धावत्या ट्रेनमध्ये एटीएम बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रवाशांना धावत्या गाडीत एटीएमची सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासनाने सर्व प्रथम मनमाड-मुंबई दरम्यान धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसची निवड करण्यात आली आहे.आगामी काळात टप्प्या टप्प्याने इतर गाड्या मध्ये विशेषता लांब पल्ल्याच्या गाड्यात प्रवाशांना ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. रेल्वे प्रशासनाने एक्स्प्रेसमध्ये एटीएम सुविधा उपलब्ध करून देण्याच्या घेतलेल्या या निर्णयाचे प्रवाशांनी स्वागत करून समाधान व्यक्त केले.

प्रवाशांना सर्व सोयी सुविधा मिळाव्या यासाठी रेल्वे प्रशासनातर्फे वेळोवेळी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात सध्या अमृत भारत योजने अंतर्गत देशभरातील अनेक रेल्वेस्थानकाचा कायापालट केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रवाशांना चांगली सुविधा देण्यासाठी धावत्या गाडीत एटीएम बसविण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार

## भूसंपादन मोबदल्यास विलंब; बँकांच्या दरापेक्षा केवळ एक टक्के अधिक व्याजदर

**मुंबई | प्रतिनिधी**

भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिल्या गेल्यास आता त्या रकमेवरील व्याज एकाच दराने दिले जाईल. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) फक्त एक टक्क्यांनी अधिक असेल, असा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका विविध पायाभूत सुविधांसाठी आपली जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना बसणार आहे. राज्य सरकारने विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या भूसंपादनामुळे जमीन मालकांना चांगला मोबदला, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना होत असल्याने विरोधाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. या अधिनियमात जमीन मालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास कलम ३०(३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ तसेच कलम ८० नुसार ९ टक्के आणि १५ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पांच्या मूळ खर्चात वाढ होत असे.

मूळ प्रकल्प खर्चातील वाढ रोखण्यासाठी आता या व्याजदरात बदल करुन भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येईल. हा दर बँकासाठीच्या व्याज दराहून एक टक्के अधिक असेल. थकीत मोबदल्यावर या दराने दरसाल दर शेकडा प्रमाणे व्याज आकारण्याची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याबाबत विधेयक विधिमंडळात मांडण्यात आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

### शेतकऱ्यांना आमिष दाखवणारे रॅकेट कार्यरत

केंद्र सरकारच्या २०१३ च्या कायद्यानुसार भूसंपादन प्रक्रिया पार पडून निवाडा झाल्यानंतर पहिल्या वर्षात ९ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे. तर विलंब झाल्यास दुसऱ्या वर्षी १५ टक्के व्याज देण्याचे कायद्यात नमूद केले आहे. मात्र, राज्यात शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याच्या व्याजापोटी अधिक रक्कम मिळवून देण्याचे आमिष देणारे रॅकेट कार्यरत आहेत. हे रॅकेट वकिलांच्या मदतीने न्यायालयात जातात. न्यायालयात अनेक वर्ष खटला चालून निकाल आल्यानंतर सरकारला व्याजापोटी मोठी रक्कम मोजावी लागते. त्यामुळे राज्य सरकारने भूसंपादन विलंबापोटी बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

### मंत्रिमंडळाचे अन्य निर्णय

- शिधावाटप दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ;प्रतिक्विंटल १५० ऐवजी १७० रुपये मिळणार
- कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाईचे धोरण;मृत्यू प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई
- राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता तसेच नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये बदल
- स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील मालमत्ता करासाठी अभय योजना;थकबाकीदारांचा दंड माफ होणार

# पुणे विद्यार्थी गृह महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती

**नाशिक |** येथील पुणे विद्यार्थी गृहाचे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यवाह संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ.एम.व्ही. भालेराव, ग्रंथपाल संदीप दराडे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. साई पगार या विद्यार्थ्याने प्रास्ताविक केले तर गायत्री पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी निवृत्ती डावखर, दीपाली रायते यांनी प्रयत्न केले.




# विद्यापीठांमध्ये वर्षातून दोनदा प्रवेश

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील विद्यापीठांमध्ये आता वर्षातून दोनदा प्रवेश होतील. विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. अधिसूचनेनुसार आता इग्नूसारखे कोणतेही विद्यापीठ जुलै-ऑगस्ट आणि जानेवारी-फेब्रुवारीमध्ये वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया सुरू करू शकते. विद्यापीठे त्यांच्या पायाभूत सुविधा, प्राध्यापक आणि समर्थन प्रणालीनुसार वर्षातून दोनदा प्रवेश घेऊ शकतात आणि त्यासाठी नियम लागू करू शकतात, असे यूजीसीने अधिसूचनेत स्पष्ट केले आहे.

यूजीसीच्या अधिसूचनेनुसार, विद्यार्थी आता कमी वेळेत त्यांची पदवी पूर्ण करू शकतात आणि विस्तारित पदवी कार्यक्रम देखील घेऊ शकतात. या निर्णयामुळे त्वरित किंवा विस्तारित पदवी कार्यक्रमाद्वारे पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा नियम लागू झाला आहे. आता विद्यार्थ्यांसमोर तीन पर्याय असतील. पहिला पर्याय म्हणजे ठरावीक कालावधीत पदवी मिळवणे. दुसरा पर्याय म्हणजे निर्धारित कालावधीपेक्षा जास्त वेळात पदवी मिळवणे हा आहे. विद्यार्थी पहिले किंवा दुसरे सत्र पूर्ण केल्यानंतर अक्सलिरेटेड डिग्री प्रोग्राम निवडून पदवी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले पेडिटस- मिळवू शकतील. तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात एकूण सहा सेमिस्टर असतील. विद्यार्थी पाच सत्रांमध्ये पदवी पूर्ण करू शकतील. पदवीच्या चार वर्षांत आठ सेमिस्टर असतील. विद्यार्थी सहाव्या किंवा सातव्या सत्रात हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकतील.

## शब्दकोड :२५३



**आडवे शब्द :** १) मुद्दाम काढलेली खोडी ५) वारा घेण्याचे एक साधन ७) मजबूत ११) सारखे प्रमाण १३) युद्ध १४) मर्कटलेला १६) सरस्वतीचे एक नाव १८) रोमचा नागरिक १९) निमग्न, गुंग २०) जुगाराचा एक प्रकार २२) एक मोठे फळ २३)किंमत २५) नाकावरील मोत्याचा दागिना २७) चुलता २८) पदार्थाला गोडी आणणारा पांढरा पदार्थ २९) माघारी येणे ३०) मंत्रीमंडळ ३२) बैलाच्या नाकातील दोरी ३५) पडणे ३७) खळबळजनक घटना ३९) खादाड राक्षस ४०) उत्तराधिकारी ४२) श्री कृष्णाने अर्जूनाचे युद्धात चालविलेले वाहन ४४) यात्रेस जाणे ४५) रंग बदलणारे फूल ४७) अंधार ४८) काना जवळचा भाग ५०) जहर ५१) लहान मुलांचे गाणे ५३) अपमान ५४) बोटाच्या टोकावरील कवच ५६) तोंडाचा खालचा निमुळता अवयव ५७) दुर्दशा ५९) खोडायचे साधन ६१) एकरूप ६५) माठ-एक मृत्तिकापत्र ६७) हादरा, ठोसा, घाव ६८) वेळ घालविणे ६९) दक्ष ७०) रत्न

**उभेशब्द :** १) बारीक काडी २) कौसल्यापुत्र ३) अथळ आकार ४) फिकीर ६) संसद सदस्य ७) प्रत्येक दिवशी ८) अर्धवर्तुळाकार ९) रोखलेली नजर १०) चेतनाहीन १२) धुंदी, कैफ १५) भीती, कचेद १७) रुक्ष, कोरडे २०) ओंकाराची तिसरी मात्रा २१) बांगड्यांचा व्यवसाय करणारा २४) मत देण्याची क्रिया २६) टिंगल, चेष्टा २७) कूर्म २९) अट, परंतु ३१) कावळ्यांचे ओरडणे ३३) पातळसर ३४) पोरका ३५) अनुमती ३६) नूतन ३७) अखेरीस ३८) रंग बदलणारा प्राणी ४१) जाडसर पीठ ४३) मत नोंदविण्याचा कागद ४६) एक मराठी महिना ४८) जनावरांचे पिल्लू ४९) चंद्र ५०) उगाच, अकारण ५२) शिक्का, छाप, आम्रवृक्षाची मांजिरी ५३) सोपे नसलेले ५५) धान्यातील कचरा ५८) डुक्कर ६०) साखरेची फुगीर वडी ६२) कामदेव ६३) प्रभात ६४) वाळवंट ६५) पुष्परस ६६) कचरा

### शब्दकोड२५२चे उत्तर

